# बंजारा समाजातील सुशिक्षित बेरोजगारांच्या समस्या एक समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव विज्ञान शाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती पदवीचा पूर्व संशोधन आराखडा**


संशोधक

**प्रा. श्री बाबुराव होनाजी राठोड**

उच्च माध्यमिक आश्रम शाळा चव्हाणवाडी

ता.मुखेड जि. नांदेड

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. दगडू नरसिंग दामावले**

समाजशास्त्र विभागप्रमुख

पंडित दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय, देवणी

ता. देवणी जि. लातूर

**संशोधन केंद्र**

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर


**ऑगस्ट : २०२४**

## प्रस्तावना

देशात सुशिक्षित बेरोजगारीची ज्वलंत समस्या आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या. परंतू बेरोजगारीची समस्या सरकारला सोडविता आली नाही. पूर्वी देशात बेरोजगारी संबंधीची आकडेवारी ही रोजगार कार्यालयात नोंदविण्यात आलेल्या आकडेवारीवरून दिली जायची. विशेष म्हणजे रोजगार कार्यालये शहरी भागातच असायची. ग्रामीण भागात रोजगार कार्यालये नसल्यामुळे ग्रामीण भागातील बेरोजगारी सबंधीची आकडेवारी उपलब्ध नव्हती. तसेच शहरी भागातील रोजगार कार्यालयात ज्यांनी नोंदणी केली. त्यांचीच माहीती प्राप्त होत असे. अनेक बेरोजगार रोजगार कार्यालयात नोंदणी करीत नव्हते. म्हणून भारतातील पूर्वीची बेरोजगारी संदर्भातील आकडेवारी ही रोजगार, कार्यालयातील माहितीच्या आधारे सांगितली जायची अलीकडे ही रोजगार कार्यालये बंद करण्यात आली आहे. या संदर्भात पिगू म्हणतात की, "जी व्यक्ती प्रचालित मजुरीच्या दरावर काम करण्यास तयार असते परंतू त्या व्यक्तीला काम मिळत नाही त्यावेळी ती व्यक्ती बेरोजगार समजली जाते.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या (ILO) व्याख्येनुसार, सुशिक्षित बेरोजगार कामगार म्हणजे असे लोक जे सध्या काम करीत नाहीत, पण त्यांना काम करण्याची इच्छा आहे. जे वेतनाकरीता काम करण्यास सक्षम आहेत, जे सध्या कामासाठी उपलब्ध आहेत आणि जे क्रियाशीलपणे कामाचा शोध घेत आहेत.

सक्सेना यांच्या मते, " ज्यावेळी देशात प्रचलित मजुरीच्या दराने काम करण्यात तयार असलेल्या कार्यक्षम लोकांची संख्या बरीच मोठी असतेः परंतु त्यांना काम उपलब्ध नसते त्यावेळी त्या स्थितीला बेरोजगारी असे म्हणतात."

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने 'जागतिक रोजगार आणि सामाजिक दृष्टीकोन प्रवाह २०१८' बाबतचा एक अहवाल प्रकाशित केला. भारतात २०१७ मध्ये सुशिक्षित बेरोजगार व्यक्तींची संख्या १८.३ दशलक्ष होती. या अहवालानुसार २०१८ मध्ये बेरोजगार व्यक्तींची संख्या १८.६ दशलक्ष आणि २०१९ मध्ये ही संख्या १८.९ दशलक्ष पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. तसेच या अहवालात असेही नमूद करण्यात आले की, २०१७ मध्ये वेरोजगारी आणि सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. जागतिक बँकेचा बेरोजगारी संबंधीचा अहवाल में २०१८ मध्ये प्रसिध्द झाला. प्रस्तुत अहवालात २ मे २०१८ च्या बातमीनुसार भारतात दर महिन्याला १.३ दशलक्ष तरूणांना नोकरीची आवश्यकता आहे. तर दरवर्षी ८ दशलक्ष (80लाख) रोजगारांची गरज आहे. २०१५ मध्ये भारतात रोजगार दर ५२ % होता. तर त्याचवेळी नेपाळ ८१ % मालद्वीप ६६ %, भुतान ६५ % आणि बांगला देशात ६० % रोजगार दर होता.

२०१८ मध्ये देशातील सुशिक्षित बेरोजगारीचा दर खूप जास्त वाढला. आऊटलूकच्या वेबसाईटवर ५ एप्रिल २०१८ रोजी दिलेल्या भारताच्या श्रम ब्यूरो सांख्यिकीनुसार भारत हा जगातील सर्वात जास्त बेरोजगार असलेला देश आहे. भारतात स्वयंरोजगाराच्या संधी कमी होत आहे. भारत सरकारच्या श्रम आणि रोजगार मंत्रालयाचा 5वा वार्षिक रोजगार बेरोजगार सर्वे २०१५-१६ नुसार देशात १ हजार लोकांमध्ये ५० लोक बेरोजगार तर शहरी भागात ४० आणि ग्रामीण भागात ५१ लोक बेरोजगार होते. महाराष्ट्रात १ हजार लोकांमध्ये २१ तर शहरी भागात २३ आणि ग्रामीण भागात २० लोक बेरोजगार होते. फेब्रुवारी २०१८ मध्येदेशात बेरोजगारीचा दर ६.०६ % होता. परंतु त्यावेळी महाराष्ट्रात मात्र हा दर ३.७ % होता. आपल्या देशात ग्रामीण भागात अदृश्य स्वरूपातील बेरोजगारी आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील कृषी क्षेत्रात अदृश्य बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आहे.

कृषीक्षेत्राचे मागासलेपण लोकसंख्या वृध्दी, कुटीर आणि लघु उद्योगांचा हास, सिंचनाच्या अपुऱ्या सोयी, औद्योगीकीकरणाची संथ वाढ सदोष शिक्षणपध्दती, सदोष नियोजन, कमी बचत आणि गुंतवणूक, अर्थिक मंदी इत्यादी सुशिक्षित बेरोजगारीची कारणे आहेत.

जुलै २०११ ते जून २०१२ या कालावधीत पार पडलेल्या ६८ व्या NSSO च्या सर्वेक्षणांतर्गत जमा केलेली माहिती सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने प्रसिध्द केली. NSSO ने रोजगारी आणि बेरोजगारीबाबत माहिती जमा करण्यास २७ व्या फेरीपासून सुरूवात केली.

महाराष्ट्र राज्याच्या रोजगार आणि उद्योजकता विभागाकडील नोंदीनुसार, राज्यातील नोंदीत सुशिक्षित बेरोजगार युवकांची संख्या ६२ लाख ७ हजार २६६ इतकी आहे. यापैकी मुंबईत ३ लाख ८६ हजार १६७, ठाण्यात ३ लाख ७२ हजार ६१, पुण्यात ४ लाख ७२ हजार ४०, औरंगाबादमध्ये २ लाख ९३ हजार २६५, नागपुरात २ लाख ९७ हजार १७१, कोल्हापूर जिल्ह्यात २ लाख ७३ हजार ३६७ आणि नांदेड ३ लाख २३ हजार बेरोजगार युवकांच्या नोंदी रोजगार केंद्राकडे आढळून येतात. या आकडेवारीवरून, पुणे, मुंबई आणि ठाण्यात सर्वाधिक बेरोजगार युवक असल्याचा समज होतो. मात्र, लोकसंख्येच्या निकषावर तपासले तर सुशिक्षित बेरोजगारीचे प्रमाण कमी आहे.

मुंबईची आजची लोकसंख्या २ कोटी १२ लाख ९७ हजार इतकी आहे, त्यातुलनेत मुंबईतील सुशिक्षित बेरोजगारांचे प्रमाण केवळ १.८१ टक्के इतकेच येते. याच निकषानुसार, ठाणे २.४२ टक्के, नाशिक ३.८८, नागपूर ५.५८, पुणे ३.८२ आणि औरंगाबाद जिल्ह्यातील बेरोजगारीचे प्रमाण ६.१८ टक्के इतके येते. कोल्हापूर जिल्ह्यात मात्र बेरोजगार युवकांचे प्रमाण तब्बल ६.४१ टक्के आहे. तर नांदेड जिल्ह्यात सुशिक्षित बेरोजगारांचे प्रमाण ९.८४ टक्के आहे.

| नांदेड जिल्ह्यातील तालुका निहाय तांड्याची संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **तालुक्याचे नाव** | **तांड्याची संख्या** | **अ.क्र.** | **तालुक्याचे नाव** | **तांड्याची संख्या** |
| १. | किनवट | १८३ | २. | मुखेड | १२९ |
| ३. | माहूर | १०८ | ४. | हदगाव | ७६ |
| ५. | लोहा | ७५ | ६. | कंधार | ५३ |
| ७. | भोकर | ५२ | ८. | देगलूर | २९ |
| ९. | हिमायतनगर | २९ | १०. | उमरी | २४ |
| ११. | नायगाव | १६ | १२. | मुदखेड | १५ |
| १३. | अर्धारपूर | ०७ | १४. | नांदेड | ०६ |
| १५. | बिलोली | ०३ | १६. | धर्माबाद | ०१ |
| **एकूण** | | | **८०६** | | |

वरील तक्त्यात नांदेड जिल्ह्यातील तालुका निहाय तांड्याची संख्या दिली आहे. यावरून किनवट तालुक्यामध्ये सर्वाधिक १८३ तांडे असून त्यानंतर अनुक्रमे मुखेड १२९, माहूर १०८, हदगाव ७६, लोहा ७५, कंधार ५३, भोकर ५२, देगलूर व हिमायतनगर प्रत्येकी २९, उमरी २४, नायगाव १६, मुदखेड १५, अर्धापूर ७, नांदेड ६, बिलोली ३ आणि धर्माबाद १ या प्रमाणात तांडे आहेत. नांदेड जिल्ह्यामध्ये एकूण ८०६ तांडे आहेत. तांड्याचा बहुतांश भागात माळरान जमीन आहे. बहुतांश तांड्यावर आजसुद्धा आधुनिकरणाच्या सोयी पोहोचलेल्या नाहीत. त्यामुळे सुशिक्षित तरूणांना रोजगारांसाठी हैद्राबाद, पुणे, मुंबई अशा ठिकाणी काम शोधण्यासाठी जावे लागते.

## सुशिक्षित बेरोजगार संकल्पना

सुशिक्षित बेरोजगारी ही एक प्रतिकूल परिस्थिती आहे जिथे काम करण्यास सक्षम असलेल्या आणि सक्रियपणे रोजगार शोधणाऱ्या तरूणांचा यामध्ये समावेश होतो .ही एक बहुआयामी सामाजिक-आर्थिक समस्या असून ती लोकसंख्या वाढ, सरकारचे अयोग्य धोरण, पारंपरिक शिक्षण पद्धती यासारख्या घटकांमुळे सुशिक्षित बेरोजगारांची संकल्पना पुढे

येते. भारतासारख्या विकसनशील देशात अर्थव्यवस्थेचा स्थिर दर सुशिक्षित तरुणांच्या गरजा पूर्ण करू शकत नाही, सुशिक्षित बेरोजगारी ही एक विलक्षण घटना आहे. सुशिक्षित बेरोजगारांची संकल्पना दिवसेंदिवस विस्तारत आहे.

**संशोधन समस्या**

संशोधन कार्यात संशोधन समस्या ही प्रथम पायरी आहे. त्यामुळे कोणत्याही संशोधनाची सुरूवात करताना सर्वप्रथम संशोधन समस्या निवडणे महत्त्वाचे असते. समकालीन स्थितीचा विचार करता बंजारा तांड्यावरील उत्पादनाचे कोणतेही साधने नसल्यामुळे सुशिक्षित बेरोजगारांची समस्या हा प्रश्न समाजात गंभीर बनला आहे. प्रत्यक्षात नांदेड जिल्ह्याच्या बंजारा समाजातील सुशिक्षित तरूणांची संख्या व बेरोजगारांची स्थिती जाणून घेण्याच्या उद्देशाने **बंजारा समाजातील सुशिक्षित बेरोजगारांच्या समस्या एक समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा** हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**संशोधनाचे महत्त्व**

तांड्यावरील जमिनीचे स्वरूप माळराण असण्याबरोबर त्यांच्या शेतीला सिंचनाच्या कोणत्याही सोयी-सुविधा नाहीत. त्यांना पीण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागते. तसेच त्यांच्याकडे उत्पादनाचे कोणतेही साधने नसल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती बीकट झाली आहे. रोजगार मिळेल या आशेने शिकलेल्या सुशिक्षित तरूणांच्या हाताला कोणतेही काम नसल्याने तांड्यावरील सुशिक्षित बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यासाठी नांदेड जिल्ह्याच्या बंजारा समाजातील सुशिक्षित बेरोजगारांची निश्चित संख्या आणि त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे ठरणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

संशोधन समस्येचे विधान व संरचनात थोड्याफार प्रमाणात गोंधळ निर्माण होऊ शकतो. अशा प्रकारचा गोंधळ टाळण्यासाठी संशोधन समस्येचे नेमक्या शब्दात प्रतिपादन होणं

गरजेचे असते. हे नेमकेपण संशोधन प्रश्न, उद्दिष्टे परिकल्पना तसेच कार्यात्मक व्याख्यांच्या लिखाणाने येते. उद्दिष्ट संशोधकाला आणि प्रतिसादकाला जास्त सुस्पष्टता देतात. संशोधनाचा पाया उद्दिष्टे आहे. त्यामुळे ते संपूर्ण संशोधन प्रक्रियेला मार्गदर्शक ठरतात. उद्दिष्टांची यादी फारच लहान किंवा फारच मोठी नसावी. उद्दिष्टांच्या स्पष्टेतून संशोधक नेमके काय शोधणार आहे याचे दिग्दर्शन होते. कोणतेही संशोधन हाती घेत असताना संशोधक काही प्रश्नांवर भर देतो. संशोधक प्रश्नांची रचना वाक्यानुसार करता. काही संशोधक उद्दिष्टांनाच प्रश्नरूपाने मांडतात असे करणे टाळणे पाहिजे. त्यामुळे उद्दिष्टांचे पुनः पुन्हा मांडणी होते.

अभ्यासाच्या स्वरूपावरून आधारित संशोधन परिकल्पनेची मांडणी, रचना करतो. परिकल्पना या पूर्वी झालेल्या संशोधनातून, सैद्धांतिक रचनेतून उगम पावतात. संशोधक पूर्वी झालेल्या संशोधन कार्याचा अनुशंगाने परिकल्पनांचे स्वरूप निश्चित करू शकतो. त्यामुळे संशोधकास संशोधन परिकल्पना लिहिणे शक्य होते. परिकल्पनेच्या मांडणीरून संशोधकास त्या क्षेत्रातील पुरेसे ज्ञान आहे हे समजते. तसेच माहिती संकलन आणि विश्लेषण करण्याची दिशाही समजते. त्यामुळे परिकल्पना ही दर्शविणारी असावी. परिक्षणक्षम असावी, स्पष्टीकरणक्षम असावी आणि दोन चलांतील सहसंबंध प्रस्तुत अभ्यास पूर्ण करण्यासाठी खालील संशोधनाचे उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. नांदेड जिल्ह्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
२. सुशिक्षित बेरोजगार तरूणांचा आढावा घेणे.
३. सुशिक्षित बेरोजगार तरूणांच्या समस्येचा अभ्यास करणे.
४. सुशिक्षित बेरोजगार तरूणांच्या उत्पादन साधनांचा अभ्यास करणे.
५. तरूणांशी संबंधित समस्येच्या अनुषंगाने शिफारशी सूचविणे.

**संशोधनाची गृहीतके**

विषयाचा अभ्यास करावयाचा असल्यास संशोधकाला प्रथम त्या विषयासंबंधी काहीतरी पूर्वज्ञान असावे लागते. ह्या प्रारंभीकर ज्ञानाच्या आधारे संशोधक आपल्या विषयासंबंधी कोणतेतरी सामान्य अनुमान अथवा सिद्धांत बांधतो. हे अनुमान पुढील संशोधनासाठी मार्गदर्शक ठरते. तो आपले लक्ष आवश्यक तथ्यावर केंद्रीत करतो. आपल्या संशोधनाची दिशा ठरवून त्यासंबंधी पुरावे गोळा करतो व अध्ययनाच्या शेवटच्या चरणात आपले पूर्व अनुमान खरे आहेत अथवा नाही ह्याचा निष्कर्ष काढतो. गृहीतकृत्ये निर्मिती हे संशोधनाचे अंतिम लक्ष नव्हे हे गृहीतकृत्ये सिद्ध करण्यासाठीच अध्ययन करावयाचे नसते. सत्य कोणते हे संशोधकाचे अंतिम लक्ष आहे. सत्य हे वास्तविक तथ्यांच्या आधारे उपलब्ध होत असते. गृहीतकृत्याच्या आधारावर नव्हे. गृहीतकृत्ये ही मुख्य विषयांवर किंवा समस्येवर लक्ष केंद्रीत करण्यास अध्ययनाची दिशा ठरविण्यास सहाय्यक ठरते. संशोधक एका निश्चित दिशेने संशोधन करीत असतो. मग ते गृहीतकृत्ये सत्य होईल किंवा अत्यत निघू शकते. प्रस्तुत संशोधनासाठी खालीलप्रमाणे गृहीतके निश्चित करण्यात आली आहेत.

१. नांदेड जिल्ह्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे.

२. नांदेड जिल्ह्यामध्ये सुशिक्षित बेरोजगार तरूणांची संख्या फार मोठ्या प्रमाणात आहे.

३. सुशिक्षित बेरोजगार तरूणांसमोर कौटुंबिक, विवाह, आर्थिक इत्यादी प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

४. नांदेड जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार तरूणांच्या हाताला काम देण्यासाठी कोणत्याही प्रकारचे उत्पाधन साधने नाहीत.

५. तरूणांशी संबंधित समस्येच्या अनुषंगाने शिफारशी सूचविणे.

## संशोधनाची मर्यादा

कोणत्याही प्रकारच्या संशोधनात आवश्यक आणि अभिरूची प्रमाणे संपूर्ण क्षेत्र, चले, जनसंख्या यांचा समावेश करणे कठीण असते. त्यामुळे प्रत्येक अभ्यासाला ठराविक अशा मर्यादा असतात. मर्यादा म्हणजे अशी स्थिती जी संशोधकांच्या नियंत्रणापलीकडची आहे आणि त्यामुळे निष्कर्षावर काही बंधने येऊ शकतात. काहीवेळा माहिती गोळा करण्याची साधनाची पुनर्वैधता करणे शक्य नसते. ही अभ्यासाची एक मर्यादाच ठरते. म्हणून प्रस्तुत अभ्यासासाठी नांदेड जिल्हा हा संशोधनाचे कार्य क्षेत्र म्हणून निवडला आहे. ही या संशोधनाची मर्यादा आहे.

## संशोधन पद्धती

संशोधन हे इंग्रजी भाषेतील Research या शब्दाचा पर्यायी शब्द आहे. इंग्रजी शब्दकोषापासून "संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्त्वे यांचे पुन्हा-पुन्हा परीक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास म्हणजेच संशोधन पद्धती होय." प्रत्येक अध्ययन विषयात ज्या संकल्पना, सिद्धांत, निष्कर्ष स्वीकृत झालेले आहेत. त्यांचे प्रामाण्य पुन्हा-पुन्हा तपासून पाहणे हे त्या अध्ययन विषयांच्या अभ्यासकांचे कार्य आहे. जे सिद्धांत विभिन्न शास्त्रात प्रस्थापित झालेले आहेत. त्याची विश्वासार्हता तपासून पाहणे हे संशोधकाचे कार्य आहे. संशोधनामुळे मान्य झालेल्या नवीन तथ्यांच्या आधारावर प्रस्थापित ठरलेल्या सिद्धांतांत काही बदल करण्याची आवश्यकता स्पष्ट झाली, तर अशा सिद्धांताची नव्याने मांडणी करण्यासाठी संशोधनाची गरज पडते. शैक्षणिक संशोधन पद्धतीचे वर्गीकरण खालील तीन पद्धतीत करण्यात येते. यामध्ये मूलभूत संशोधन, उपयोजित संशोधन आणि कृती संशोधन असे तीन प्रकार पडतात. प्रस्तुत संशोधन हे उपयोजित संशोधनाशी निगडित असून यासाठी ऐतिहासिक, विश्लेषणात्मक, सर्वेक्षणात्मक आणि सांख्यिकीय संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

## नमुना निवड

नमुना निवडीच्या प्रामुख्याने संभाव्यता आणि गैर संभाव्यता अशा दोन पद्धती आहेत. यांची पुढीलप्रमाणे मांडणी केली आहे.

**नमुना निवडीचे प्रकार**

| संभाव्यता नमुना निवड | गैर संभाव्यता नमुना निवड |
| --- | --- |
| ↓ | ↓ |
| सरळ यावृच्छिक नमुना | सोयीस्कर नमुन |
| ↓ | ↓ |
| पद्धतशीर नमुना | कोटा नमुना |
| ↓ | ↓ |
| स्तरीय नमुना | स्नोबॉल नमुना |
| ↓ | ↓ |
| एकक पुंज नमुना | स्वनिर्णीत नमुना |
| ↓ | |
| क्षेत्र नमुना | |
| ↓ | |
| बहुस्तरीय नमुना | |
| ↓ | |
| आनुपातिक नमुना | |
| ↓ | |
| नियमित चिन्हांकित नमुना | |

प्रस्तुत संशोधनाची प्रश्नावली भरून घेण्यासाठी नमुना निवड पद्धतीतील क्षेत्र पद्धतीचा उपयोग करून तांड्यावरील पदविधर सुशिक्षित बेरोजगारांची स्थिती जाणून घेतली जाईल. क्षेत्र पध्दतीचा उपयोग करून नांदेड जिल्हा हे संशोधनाचे कार्यक्षेत्र म्हणून निवड केली आहे. प्रतिनिधी स्वरूपात प्रत्येक तालुक्यातून ५ तांडे म्हणजेच १६ तालुक्यातून ८० तांड्याची निवड केली जाईल. प्रत्येक तांड्यातून ५ उत्तरदाते म्हणजेच ८० तांड्यातून ४०० उत्तरदाते निवडण्यात येथील.

**संशोधनाची साधने**

कोणतेही संशोधन करण्यासाठी जी संशोधनपद्धती आपण वापरतो त्याचा योग्य परिणाम मिळण्यासाठी आपणास योग्य ती साधने, तंत्रे, नमुना निवड, परिकल्पना निर्मिती अत्यंत आवश्यक असते. या प्रकरणात आपण संशोधनासाठी पुरक असलेली साधनांचा विचार करणार आहोत. त्यातही अनेक साधनांतून संशोधकाने योग्य त्या साधनांची निवड करणे आवश्यक असते. ही निवड योग्य होण्यासाठी संशोधकाला त्या साधनांच्या गुणदोषाची व मर्यादांची जाणीव असणे आवश्यक आहे. संशोधकाने एकच साधन वापरले पाहिजे असे काही बंधनकारक नाही. तो एकापेक्षा अनेक साधनाचा उपयोग करू शकतो व ही माहिती संख्यात्मक व गुणात्मक स्वरूपाची असते.

संशोधकाने संशोधनासाठी ज्या समस्येची निवड केली आहे त्याची सोडवणूक करण्यासाठी विविध प्रकारची माहिती व आकडेवारी आवश्यक असते. तिला आपण संशोधनाची आधार सामग्री म्हणतो. ही आधार सामग्री विश्वासार्ह व वैध असावी लागते. त्यासाठी विविध प्रकारची तंत्रे व पद्धती वापरल्या जातात त्यांना संशोधनाची साधने म्हणतात. संशोधनासाठी लागणारी माहिती संकलित करण्यासाठी निरीक्षण, मुलाखती, प्रश्नावली, अभिवृत्ती मापिका, शोधिका, पडताळासूची, पदनिश्चयन श्रेणी, अंकपत्र, प्रमाणित चाचण्या समाजमिती व प्रक्षेपणातील तंत्रे इत्यादींचा उपयोग करण्यात येईल.

**प्रकरण रचना**

**प्रकरण पहिले : प्रस्तावना व संशोधन पद्धती**

**प्रकरण दुसरे : नांदेड जिल्हा एक आढावा**

**प्रकरण तिसरे : बंजारा समाजाची ओळख**

**प्रकरण तिसरे : सुशिक्षित बेरोजगार संकल्पना**

**प्रकरण चौथे : संकलित माहितीचे अर्थनिर्वचन**

**प्रकरण पाचवे : सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी**

**संदर्भ ग्रंथसूची**


१. गुप्ता कमलेशकुमार, २००५, भारतीय महिलाएँ शोषण उत्पीडन एवं अधिकार, बुक एनक्लेव, जयपूर, भारत

२. मानव विकास अहवाल, २००२, महिला सशक्तिकरण, बुक एनक्लेव, जयपुर, भारत

३. मुळे सुरेखा, २०११, लोकराज्य मासिक, माहिी व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

४. सवदी ए.बी., २००६, द मेगा स्टेट महाराष्ट्र, निराली प्रकाशन, पुणे

५. श्रीवास्तव, सुधाराणी एवं, श्रीवास्तव रागीणी, २००१, महिला अधिकार और महिला उत्पीडन, कॉमनवेल्थ पब्लिकेशन, नवी दिल्ली

६. बोगाडर्स विलियम, १९८६, सोशियोलॉजी, मैकमिलन, एण्ड कं. न्युयॉर्क

७. वेस्टरमार्क ई., १९२१, द हिस्ट्री ऑफ ह्युमन मैरिज, मैकमिलन एण्ड कं. न्युयॉर्क

८. कपाडिया के.एम., १९६६, मैरिज एण्ड फैमिनी इन इण्डिया, ऑक्सफोर्ड प्रेस, बॉम्बे

९. सक्सेना आर. एन., १९६८, भारतीय समाज एवं सामाजिक संस्थाए, पुस्तक महल, आगरा

१०. शाह ए.एम., १९९८, फेमिली इन इंडिया, क्रिटिकल एसेज, ओरिएंट लोंगमैन हैदराबाद
११. सिंह योगेंद्र, २००२, सोशल चंज इन इंडिया, क्राइसेज एंड रेजिलिएंस, हर आनंद पब्लिकेशन नई, दिल्ली
१२. आगलावे प्रदीप, २०००, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन नागपूर,
१३. जोशी पं. महादेवशास्त्री, २००३, भारतीय संस्कृतीचा एनसायक्लोपीडिया अनमोल प्रकाशन, पुणे,
१४. भिंताडे वि. रा., २००६, शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, नित्यतूनन प्रकाशन
१५. बापट भा. गो., १९७७, शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, नित्यतूनन प्रकाशन
१६. नाडगोडे गुरूनाथ, २००१, सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर
१७. जाधव तुकाराम, शिरापुकर महेश पानवी हक्क युनिक अकॅडमी पब्लिकेशन्स प्रा. लि. पुणे, जून २०१९
१८. www.wikipedia.org

संशोधक

**प्रा. बाबुराव होनाजी राठोड**
उच्च माध्यमिक आश्रम शाळा चव्हाणवाडी
ता.मुखेड जि. नांदेड

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. दगडू नरसिंग दामावले**
समाजशास्त्र विभागप्रमुख
पंडित दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय, देवणी
ता. देवणी जि. लातूर